■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक ३५ ● मंगळवार, दि. १४ ते २१ जानेवारी २०२५ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रु

# जि. प. क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप

वाशिम : मागील ३ दिवसापासुन जिल्हा परिषदेच्याअधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्रिडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सवाचा समारोप शनिवारी रात्री सायंकाळी ८.३० वाजता झाला. वाशिम जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक किरण गणेश कोवे, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिनकर जाधव, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आनंद राजुस्कर, उपमुख्य लेखा वित्त अधिकारी योगेश क्षीरसागर, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद गणविर, प्राथमिक शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, कारंजा गट विकास अधिकारी पुनम राणे, वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रवींद्र सोनोने, मालेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विनोद खेडकर, सहायक बीडिओ प्रमोद बदरखे, कृषी अधिकारी गणेश गिरी, सामान्य प्रशासन विभागाचे रविंद्र सोलव, क्रिडापटु भागवत महाले आदिंची मंचावर उपस्थिती होती. या सांस्कृतिक महोत्सव आणि क्रीडा स्पर्धेच्या समारोपाप्रसंगी सीईओ वाघमारे यांनी खेळाडुच्या भूमिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. बुधवार दि. ८ ते शुक्रवार दि. १० जानेवारी पर्यंत येथील जिल्हा क्रीडा संकुलावर जिल्हास्तरीय सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

विजयाचा जल्लोष

कारंजा पंचायत समिती विरुध्द मालेगाव पंचायत समिती या रोमहर्षक आणि उत्साहवर्धक महिला कबड्डी सामन्याचा मनमुराद आनंद उपस्थितांनी घेतला. या स्पर्धेत कारंजा पंचायत समितीचा संघ विजयी ठरला तर मालेगाव पंचायत समितीचा संघ उपविजेता ठरला. कारंजा गटविकास अधिकारी पुनम राणे यांनी या विजेयी संघाचे नेतृत्व केले होते. पुरुष क्रिकेट मध्ये रिसोड पं स संघ विजेता तर मालेगाव पं स उप विजेता ठरला. महिला क्रिकेट मध्ये मुख्यालयाचा संघ विजयी ठरला तर पंचायत समिती मालेगाव संघ उपविजेता ठरला. जलतरण पुरुष १०० मिटरमध्ये मुख्यालयाचे रामानंद ढंगारे प्रथम क्रमांकाने विजयी ठरले तर जलतरण ५० मिटर महिला मध्येमुख्यालयाच्या सुगंधा ढोके यांनीही प्रथम क्रमांक पटकाविला. मुख्यालयाचे मंगेश वाघ यांनी गोळा फेक- दिव्यांगमध्ये पहिला क्रमांक मिळविला. बॅडमिंटन मध्ये कारंजा पं स चे डहाके यांनी प्रथम तर मुख्यालयाचे अमोल सांगळे यांनी दुसरा क्रमांक पटकाविला. सायकलिंग मध्ये मंगरुळपीर पंचायत समितीचे गौतम कांबळे यांनी प्रथम तर मुख्यालयाचे राम श्रृंगारे यांनी दुसरा क्रमांक पटकाविला. मुख्यालयाचे आशिष हिरेखण यांनी बुध्दीबळ मध्ये आणि प्रविण आरु यांनी कॅरम मध्ये दुसरा क्रमांक पटकाविला. महिलांच्या वैयक्तिक व सांघिक खेळांमध्ये सर्वाधिक पारितोषिक सुरेखा देबाजे यांनी पटकावुन उपस्थितांचे लक्ष वेधुन घेतले. लोकगितामध्ये पंचायत समिती वाशिमचे दिंगांबर घोडके यांनी प्रथम तर मुख्यालयाचे अमोल कापसे आणि अभिमान लगड यांनी दुसरा क्रमांक पटकाविला. करावके गितामध्ये मालेगाव पं स चे रवि इंगोले यांनी प्रथम तर वाशिम गट विकास अधिकारी रविंद्र सोनोने यांनी दुसरा क्रमांक पटकाविला. हास्यजत्रा मध्ये मुख्यालयाचे निलेश पवार यांनी प्रथम तर वाशिम पं स चे किशोर कांबळे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला.

## बक्षिस वितरण कार्यक्रमात जल्लोश




### पंचायत समिती वाशिमला क्रिडा चषक

सुरुवातीच्या देखाव्यापासुन तर क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सरस कामगिरी करणाऱ्या वाशिम पंचायत समितीला या वर्षीचा क्रिडा चषक (जनरल चम्पिअन) बहाल करण्यात आला.

यावेळी गटविकास अधिकारी सोनोने यांच्यासह पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांनी जल्लोष केला. विविध सामन्यात व सांस्कृतिक स्पर्धेत विजयी ठरलेल्यांना मान्यवरांच्या हस्ते जल्लोषात बक्षीस वितरण करण्यात आले. उपस्थित खेळाडु व इतर कर्मचाऱ्यांनी यावेळी विजयाचा जल्लोष साजरा केला. कार्यक्रमाचे संचालन आणि आभारप्रदर्शन उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांनी केले.

# आपसी सामंजस्यातुन शेतकऱ्यांनी रस्ता केला खुला

## महसुल विभागाच्या पुढाकार शेतकरी समाधानी

**रिसोड** : तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाकद ते बाळखेड शेतशिवारा दरम्यान पैनगंगा नदीच्या काठाने असलेल्या पांदण रस्त्याची अडचण दूर करून सदर रस्ता शेतकऱ्यांकरिता आजरोजी खुला करण्यात आला.

अर्जदार मथुराबाई रामभाऊ गायकवाड यांच्या गट क्रमांक २८४ मध्ये जाण्याकरिता त्यांना रस्ता नसल्याबाबत त्यांनी अर्ज दिला होता, त्यानुसार रस्त्याची पाहणी केली असता माननीय तहसीलदार रिसोड प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी ए.व्ही. लहाने व तलाठी जी जी गरकळ व तलाठी अक्षय जाधव यांनी नदीकाठावरील शेतकऱ्यांची समजूत घालून सदर पांदण रस्ता



व वहिवाटीत असलेला रस्ता उपलब्ध करून दिला आला, त्यामुळे बाळखेड कट्ट्यापासून गट क्रमांक २८४ पर्यंत जाणारा रस्ता उपलब्ध झाला.

यावेळी नदिलगतचे शेतकरी गट क्रमांक २७६ व २७७ चे मालक योगेश व पवन अभिमन्यू गायकवाड यांनी मोलाचे सहकार्य केले. अशाप्रकारे गावोगाव शेतकरी बांधवांना रस्त्याबाबत असलेल्या अडचणी ह्या वाद-विवाद न करता सामंजस्याने सोडवण्याचे आवाहन तहसीलदार रिसोड मा प्रतिक्षा तेजनकर यांनी केले आहे. ता.प्र.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात

## रिसोड येथील कृऊबासमध्ये कार्यक्रमाचे आयोजन

**रिसोड** : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आज दिनांक १२ जानेवारी २०२५ ला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विष्णुपंत भुतेकर यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्याप्रतिमेचे पूजन करूनहार अर्पण करण्यात आला. मार्गदर्शन करताना सभापती विष्णुपंत भुतेकर यांनी सांगितले की, राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचारच जगाला तारू शकतात त्यामुळे यांच्या



विचाराचा वसा घेऊन प्रत्येकाने पुढील वाटचाल करावी असे सांगितले.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव विजय देशमुख, विनोद गिऱ्हे, निखिल देशमुख, अर्जुन पाटील खरात, केशव गरकळ, विकास झुंगरे, वैजनाथ रंजवे, मगर यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व कर्मचारी व भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.(ता.प्र.)

# चारचाकी वाहनांच्या नोंदणीसाठी पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

मुंबई, दि. १० : सध्या चारचाकी संवर्गातील खाजगी परिवहनेत्तर वाहनांकरिता एमएच ०१ ईआर ही मालिका संपुष्टात येत आहे. त्यानंतर याच संवर्गातील आगाऊ स्वरूपात सुरू असलेली एमएच ०१ ईव्ही मालिका नियमित होणार आहे. या मालिकेतील आकर्षक क्रमांक / पसंती क्रमांक हवा असल्यास वाहनधारकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) कार्यालयाच्या खिडकी क्रमांक ई -१८ वरून विहीत नमुन्यातील अर्ज शुल्क भरून १३ जानेवारी २०२५ रोजी दु १२ वाजेपर्यंत प्राप्त करून घ्यावे. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास लिलाव पद्धतीचा त्याच दिवशी १३ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता अवलंब करून नोंदणी क्रमांक जारी करण्यात येणार आहे. प्रादेशिक परिवहन मुंबई (मध्य) कार्यालयांतर्गत नवीन दुचाकी व चारचाकी वाहनांची नोंदणी करण्यात येते. वाहनांकरिता आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ नुसार आगाऊ शुल्क भरून वाहनाचा नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्याची तरतूद आहे. कार्यालयीन विहीत नमुन्यातील अर्जान्वये कोणताही उपलब्ध वाहन क्रमांक आरक्षित करता येतो. वाहन नोंदणी क्रमांक आरक्षीत करण्याकरिता विहीत शुल्काचा धनाकर्ष प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य) (यांच्या नावे सादर करणे आवश्यक आहे. या आरक्षीत केलेल्या वाहन क्रमांकाची वैधता १८० दिवसांकरिता असून १८० दिवसांच्या आत त्या क्रमांकावर वाहन नोंदणी होणे आवश्यक असते. संबंधीत कार्यालयाच्या खिडकी क्रमांक ई -१८ वर वाहनक्रमांक आरक्षित करण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज उपलब्ध आहेत. तसेच आवश्यक त्या मार्गदर्शनाकरिता कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. वाहनक्रमांक आरक्षित केल्याच्या पावतीची नोंद वाहनाच्या डेटा एन्ट्रीच्या वेळी वाहन ०४ प्रणालीमध्ये घेतल्यास त्या वाहनास आरक्षित केलेला क्रमांक प्राप्त होतो.

## संपादकीय

# चांगले कर्म करा

आपलं शरीर हे अनेक व्याधींची जननी आहे. या शरीरात नाना प्रकारचे रोग होत असतात. जे रोग शरीराला घातक असतात. शरीराला रोग का होतात? असा जर कोणी प्रश्न विचारल्यास त्याचं नेमकं उत्तर आपल्याला सापडतं. ते म्हणजे ताणतणाव. आपण नेहमीच ताणतणावात वावरत असतो. माणूस जन्मल्यापासून मरेपर्यंत माणसाला आयुष्यभर टेन्शन असतं. आता म्हणाल की जन्मतः बरोबर कोणतं टेन्शन असतं बाळाला? होय, जन्मतः बरोबरही टेन्शन असतं. कधी भूक लागली आणि आईनं दूध पाजायला वेळ केला तर त्यामुळं सुद्धा येतं लहान बाळाला मानसिक टेन्शन. काही काही काही मुलं नाजायज पैदा होतात तेव्हा त्याची आई त्याला कचऱ्यात फेकून देते. तेही त्या लहान बाळाला टेन्शन. त्यातच काही काही मुलांना जन्मतःच व्याधी असतात. त्यावेळी त्या लहान बाळालाही इंजेक्शनं टोचली जातात. तेव्हा तेही त्या बाळाचं टेन्शन. अलिकडे तर लहान बाळाला शौचालयाची जागाच राहत नाही हेही बाळाचं टेन्शन नाही का? काही काही लोकं बाळाचा गुप्त धनासाठी बळी देतात. हेही टेन्शन नाही का? कधी बाळाला जन्म दिल्यानंतर आईचा मृत्यू होतो. हेही बाळासाठी टेन्शन नाही का? त्यावेळी बाळ अनाथ होते, हळूहळू बाळ मोठं होतं. त्यावेळी त्याला त्याची आई मरण पावल्यास खंत असते व अगदी लहानपणापासूनच त्याला अनाथाचं जीवन जगावं लागतं. बाप दुसरा विवाह करुन मोकळा होतो. कधीकधी काही मुलांचे तर मायबाप दोघंही मरण पावतात तेव्हा तर त्यांचं जीवन अगदी असह्य असतं.

आज सरकार शाळेच्या माध्यमातून सांगत असतं की ताणतणावरहित रहा. परंतु अशी मुलं कशी ताणतणावरहित राहतील. कोणी कितीही अशा मुलांचं दुःख दूर करण्याचा प्रयत्न केला तरी त्या मुलांचं दुःख कोणीच दूर करू शकत नाही. आपलं दुःख आपल्यालाच दूर करावं लागतं. दुःखाबाबत सांगायचं झाल्यास दुःख येण्याला भाग्याची जोड असते असं म्हातारी माणसं म्हणत होती. कोणी म्हणायचे की पूर्व जन्मात आपण पाप केलं असेल, म्हणून आपल्याला त्याचे भोग म्हणून असे दिवस पहायला मिळाले. परंतु भाग्याला आजचा काळ मानत नसल्यानं ते पूर्वजन्माचं पापपुण्य समजता येत नाही. परंतु एका अर्थानं विचार केल्यास ज्या वेळी माता जन्म दिल्यानंतर बाळाला फेकून देते. हे फेकून देताना ज्या बाळाला ती फेकून देते, त्या बाळाचा कोणता दोष असतो? ह्याला पूर्वजन्माचं पाप म्हणता येऊ शकते. कारण कदाचित मागील जन्मात त्याच आईला तिचा जन्म झाल्यानंतर त्या बाळानं फेकून दिलं असेल हे नाकारता येत नाही. आजकाल जन्म घेताना काही काही मुलांचा जन्म अशा ठिकाणी होतो की त्या ठिकाणी धड बाळाला पोटभर खायला मिळत नाही. तसेच काही काही बाळाचा जन्म अशा ठिकाणी होतो की ज्याच्या पायाशी सुख लोटांगण घेत असतं. ह्याला काय समजावं? त्याला पूर्व जन्माचं पापपुण्य समजता येत नाही तर काय? अलिकडे कोरोनाच्या काळात हाच अनुभव आला. काही काही काही माणसं धडधाकट असूनही तसेच ती उत्तम प्रकारची काळजी घेऊनही ती कोरोनानं मरण पावली. अन् काही काही माणसं धडधाकट नसूनही व कोणत्याही प्रकारची काळजी न घेऊनही जगत आहेत. यालाही पापपुण्य समजता नाही येऊ शकत काय? हे आपलं पापपुण्यच आहे. परंतु जो मानेल किंवा समजेल. त्याला ते पापपुण्य कळेल. महत्त्वाचं म्हणजे आपले चांगले कर्म आपल्याला चांगलं फळ देऊ शकतात. तसेच आपले वाईट कर्मच आपल्याला वाईट कर्म प्रदान करतात. कोणी म्हणतात की आपण जे कर्म करतो. त्याचे फळ त्याच जन्मात प्राप्त होत असते. कारण असा जन्म वा पुनर्जन्म कोणीही पाहिलेला नाही. परंतु हे जरी खरं असलं तरी पुनर्जन्म नाही असं म्हणता येत नाही वा मानता येत नाही.

## राज्य शासनाच्या उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ साठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

वाशिम, दि.१० जानेवारी (जिमाका): माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका पाठविण्याची शेवटची तारीख ३१ जानेवारी, २०२५ अशी आहे. राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचं नमुने dgipr.maharashtra.gov.in व www.maharshtra.gov.in तसेच https://mahasamvad.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी केली चिया पिकाची पाहणी



वाशिम ,दि.८ जानेवारी (जिमाका) ६ जानेवारी २०२५ रोजी कोंडाळा झामरे येथे जिल्हाधिकारी बुवनेश्वर एस यांचे हस्ते मग्ररोहयो अंतर्गत जलतारा कामाची भूमिपूजन करून जलतारा अभियानाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी विभागीय वन अधिकारी अभिजीत वायकोस , अप्पर जिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, प्रकल्प संचालक आत्मा अनिसा महाबळे, जिल्हा पुरवठा अधिकारी दादासाहेब दराडे, तालुका कृषी अधिकारी ,अतुल जावळे,तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक,जयप्रकाश लव्हाळे, सरपंच शिल्पाताई वाठोरे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी यांनी वाढीच्या विविधअवस्थेत असलेल्या चीया पिकाच्या पाहणी सुद्धा यावेळी केली व शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच या पिकाच्या उत्पादन वाढीकरिता महत्त्वाच्या बाबी लक्षात घेऊन त्यावर भर देण्यास सांगितले तसेच याची गुणवत्ता राखण्यासाठी यामधील मोहरी पिकाचे समुच्च निर्मूलन करण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी दक्षता घ्यावी असे आवाहन त्यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी केले. गुणवत्तापूर्ण चिया सीड्स ची निर्मिती करून आपल्या जिल्ह्याची ओळख निर्माण करावी असे त्या यावेळी म्हणाल्या. त्याचबरोबर कांदा बीज उत्पादन, फलोत्पादन,मधुमक्षिका पालन व शेतीपूरक उद्योगातून उन्नती साधण्याच्या दृष्टीने शेतमाल प्रक्रिया मार्केटिंग ब्रॅण्डिंग यावर भर दिल्यास शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे अर्थार्जण होण्याच्या दृष्टीने या बाबी खूप फायदेशीर असल्याने शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा असेही यावेळी आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रमात जिल्हाधिकारी यांनी मत मांडले. विभागीय वन अधिकारी अभिजीत वायकोस यांनी जिल्ह्यामध्ये होत असलेल्या चिया पिकासंदर्भात समाधान व्यक्त करत शेतकऱ्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविक भाषणात जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरिफ शहा यांनी चिया पिकाच्या जिल्ह्यातील वाटचालीबाबत सविस्तर वृत्तांत कथित केला. प्रास्ताविक महादेव सोळंके यांनी केले तर जयप्रकाश लव्हाळे यांनी सर्वांचे आभार मानले. शेतकऱ्यांच्या वतीने जगदीश देशमुख यांनी उपस्थित अधिकारी कर्मचारी यांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळ कृषी अधिकारी वाशिम एम.डी.सोळंके, कृषी पर्यवेक्षक नितीन ठाकरे,सिद्धार्थ गिमेकर, कृषी सहायक नितीन वाडेकर, राजुभाऊ ठाकरे, राजेश छत्रे, कु.सी.डी.तोटवाड , माधव झांबरे, दत्तात्रय बुंदे, जगदीश देशमुख या शेतकऱ्यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमास गावातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

## महापुरुषांच्या जयंतीनिमित्त लावणार 'जयंती फलक' - मंत्री मंगल प्रभात लोढा

मुंबई, दि. १० :- महाराष्ट्र शासनातर्फे मंत्रालयात, राज्यातील सर्व शासकीय कार्यालयात आणि प्रशासकीय मुख्यालयात थोर महापुरुषांची जयंती साजरी केली जाते. या कार्यक्रमांच्या वेळी सर्वसामान्य जनतेस महापुरुषांच्या कार्याची माहिती मिळावी यासाठी शासनाने थोर महापुरुषांची जयंती असताना त्यांच्या प्रतिमेसह जीवन कार्याबाबत माहिती देणारे फलकही लावण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. आज त्याबाबतचा शासन निर्णयही निर्गमित झाला आहे. महापुरुषांच्या जयंतीनिमित्त मंत्रालय, सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, शाळा व महाविद्यालये येथे त्यांच्या प्रतिमेसह जीवन चरित्राची माहिती देणारे फलकही लावण्यात येतील.

## वाचन हा एक छंद-प्रा. डॉ खेडेकर



रिसोड : येथील स्व पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय रिसोड येथे 'लेखक व विदयार्थी यांच्यामधील वाचन संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ एम एन गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली व विभागप्रमुख प्रा विजय आर गायकवाड यांच्या नियोजनाखाली करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी लेखिका म्हणून प्रा डॉ सौ मंगल कुटे खेडेकर ह्या होत्या. प्रा गायकवाड यांच्या हस्ते त्यांना पुष्पहार/बुके च्या स्वरूपात एक पुस्तक भेट देण्यात येऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ गायकवाड यांनी 'वाचन ही यशाची गुरुकिल्ली आहे. वाचनाने बुध्दीला पैलू पडतात व वाचन केल्यानेच एकमेकाशी संवाद साधणे सोपे जाते'तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा डॉ खेडेकर यांनी 'प्रत्येकाला एक छंद असावा असं म्हटलं जातं. कारण चांगला छंद प्रकृती आणि आरोग्यासाठी लाभदायक असतो. पुस्तक वाचनासारखा छंद जीवनात सद्विचार रुजवतो आणि सद्गुण अंगी भिनवतो. एकदा का शब्दांशी खेळण्याची सवय लागली की इतर गोष्टींचा विसर पडतोअन् शब्दांचा लळा लागतो, ओढ वाटते. अनेक दिग्गजांनी पुस्तके वाचणे म्हणजे आपले भाग्यचष्ठ! आपल्याही नशिबी ते भाग्य लाभावे ही प्रत्येकाची इच्छा असावी.' असे विचार मांडले तर विभागप्रमुख प्रा गायकवाड यांनी 'काही पुस्तके चाळायची, तर काही वाचनीय खरी! काही संग्राह्य, तर काही वारंवार वाचावी अशी. वाचन शिळोप्याचा उद्योग नाही, तर वाचन हा एक व्यसंग आहे, तो सतत जोपासत रहाल तर तुम्ही प्रगल्भ वाचक व्हाल! असे विचार मांडले. यावेळी विद्यार्थ्यांनी वेगवेगळया वाचनीय पुस्तकांच्या प्रश्नांची उकल संवादाद्वारे प्रमुख अतिथी कडून घेतली. प्रास्ताविक प्रा डॉ केशव कोकाटे यांनी केले. या कार्यक्रमाला समिती सदस्य प्रा डॉ इंगोले प्रा डॉ हणवते व विद्यार्थी उपस्थित होते.

## सरनाईक व बोडखे यांना राज्यस्तरीय आदर्श कला शिक्षक पुरस्कार



रिसोड : येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथील कलाध्यापक विठ्ठल सरनाईक व रिसोड तालुक्यातील स्व. नरसिंगराव नथ्थुजी बोडके विद्यालय धोडप येथील कलाशिक्षक अनंत बोडखे यांना राज्यस्तरीय आदर्श कलाशिक्षक पुरस्कार जाहिर झाला असून या पुरस्काराचे वितरण नंदुरबार जिल्हयातील शहादा येथे ११ व १२ जानेवारी रोजी होणार आहे. याबद्दल सरनाईक व बोडखे यांचे वाशिम जिल्हयातून सर्व स्तरातून कौतुक केल्या जात आहे.

कलाध्यापक संघ महामंडळ, पुणे यांच्या वतीने कला शिक्षण परिषद २०२५ चे कला शिक्षण परिषदेचे आयोजन नंदुरबार जिल्हयातील शहादा येथे दि. ११ व १२ जानेवारी २०२५ रोजी करण्यात येणार असून तेथे हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. वाशिम जिल्हयातून दोन कलाशिक्षकांना यावेळी आदर्श कला शिक्षक हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येत आहे.

कला शिक्षणपरिषदेचे नंदुरबार जिल्हयातील शहादा येथे ११ व १२ जानेवारी रोजी राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते उ?द्घाटन होणार आहे. या कला शिक्षण परिषदेत तज्ञ चित्रकारांचे मार्गदर्शन, विविध कला प्रात्यक्षिक, कला शिक्षकांचे विविध प्रश्न, शासकीय रेखा कला परीक्षा विषयक सर्व बाबी तसेच कला विषयक विविध स्पर्धा व मनोरंजन आणि कला क्षेत्रातील विकासावर आधारीत चर्चासत्र तसेच राज्य कला शिक्षक परिषदेचे संघटनात्मक कार्य यावर या शिक्षण परिषदेत मार्गदर्शन होणार आहे. तसेच राज्यस्तरीय आदर्श कलाशिक्षक पुरस्कार सरनाईक व बोडखेयांना दादाजीभुसे, शिक्षणमंत्री यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.वाशिम जिल्हयातील जास्तीत जास्त कला शिक्षकांनी या राज्यस्तरीय कला शिक्षण परिषदेला उपस्थित राहून शासनाच्या नवीन कौशल्य अधिष्ठीत कलागुणांचा सर्वागीण विकास साधण्यासाठी सहकार्य करावे.

शिक्षकांनी राज्य संघटन बळकट व मजबूत करण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन राज्य प्रसिध्दी प्रमुख शिवाजी नीलकंठे व जिल्हा सचिव चंदनशिव यांच्यासह जिल्हा कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांनी केले आहे.(श. प्र)

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

